R.No. MHHMAR/25/A3029

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ३

दि. ९ डिसेंबर २०२५, वार : मंगळवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

# दैनिक महावृत्त

E-mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## राज्यपाल आचार्य देवव्रत यांची 'माफसू' आणि कृषी महाविद्यालयाला भेट

नागपूर: राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ व डॉ . पंजाबराव देशमुख कृषी महाविद्यालयाला आज भेट देऊन पाहणी केली.




सेमिनरी हिल्स येथील महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाला भेट दिली. तसेच विद्यापीठातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती घेतली. विद्यापीठातर्फे सुरू असलेल्या संशोधन तसेच अत्याधुनिक प्रयोगशाळा आदींची पाहणी केली. यावेळी राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन पाटील तसेच विभागप्रमुख उपस्थित होते. 'माफसू' अंतर्गत येत असलेल्या पशु पैदास प्रक्षेत्राला त्यांनी भेट दिली. यावेळी गोवंश संवर्धन विशेषतः देशी गायींच्या संवर्धनाच्या सूचना त्यांनी केल्या.

महाराज बागेजवळील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी महाविद्यालयाला भेट दिली व चर्चा केली. कृषी महाविद्यालयातर्फे कृषी विषयक राबविण्यात येत असलेल्या संशोधन प्रकल्पाची तसेच संशोधित केलेले संशोधन शेतकऱ्यांपर्यंत कसे पोहोचवता येईल याची माहिती घेतली. नैसर्गिक शेतीला प्राधान्य देत अधिक उत्पादन देणाऱ्या संशोधित वाणांचा अवलंब करावा, अशा सूचना त्यांनी दिल्या. यावेळी राज्यपालांनी कृषी विद्यापीठांच्या प्राध्यापकांसोबत संवाद साधला. कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रकाश कडू यांनी विविध विभागांची माहिती दिली.

## श्रमिक चळवळींचे ज्येष्ठ नेते बाबा आढाव यांना श्रद्धांजली

मुंबई: श्रमिकांचे 'बाबा' अर्थात कष्टकरी, कामगारांचे नेते, ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव यांच्या निधनाने सामाजिक चळवळींचा आधारवड हरपला आहे, अशी शोकभावना व्यक्त करून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ सामाजिक नेते बाबा आढाव यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. आढाव यांचे निधनाने महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळींची भरून काढता येणार नाही अशी मोठी हानी झाली आहे, असेही मुख्यमंत्री यांनी म्हटले आहे.



मुख्यमंत्री शोकसंदेशात म्हणतात, महाराष्ट्राला लाभलेल्या सामाजिक चळवळींचा वारसा पुढे नेण्यासाठी अखंड आणि व्रतस्थपणे क्रियाशील राहणाऱ्यांमध्ये बाबा आढाव अग्रभागी राहिले. व्यवसायाने डॉक्टर असूनही बाबांनी संपूर्ण आयुष्य असंघटित क्षेत्रातील कष्टकऱ्यांसाठी वेचले. कचरावेचकांपासून ते हमाल, रिक्षाचालक, बांधकाम मजूर, घरेलू कामगार यांचे संघटन त्यांना न्याय, सामाजिक सुरक्षा आणि सन्मान मिळवून देण्यासाठी समर्पित केले. 'हमाल पंचायत, रिक्षा पंचायतच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक कार्याला संस्थात्मक असे रूप दिले. 'एक गाव एक पाणवठा' या त्यांच्या मोहिमेने सामाजिक समतेचा आगळा प्रयोग राबविला गेला. त्यांचा 'कष्टाची भाकर' हा उपक्रम सामाजिक क्षेत्रातील संवेदनशीलतेचे आगळे उदाहरण ठरले. आपल्या तत्वांशी ठाम, असणाऱ्या बाबांची विचार मांडण्याची शैली परखड होती. बाबा आढाव यांचे निधन अशा अनेक उपक्रम, सामाजिक चळवळींना, त्यातील कार्यकर्ते यांना पोरके करून गेले आहे. आम्ही या सर्वांच्या तसेच आढाव कुटुंबियांच्या दुःखात सहभागी असून, त्यांच्याप्रती संवेदना व्यक्त करतो. श्रमिक चळवळींचा आधारवड, ज्येष्ठ सामाजिक नेते बाबा आढाव यांना व्यक्तीशः तसेच तमाम महाराष्ट्राच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करतो, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

## महिला सक्षमीकरणाबाबतीत कोणतीही तडजोड नाही - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

नागपूर : राज्यात मुले तसेच महिलांच्या






सुरक्षेसह त्यांच्या सक्षमीकरणासाठी विविध प्रकारचे कार्यक्रम राबविण्यात येत आहे. गेल्या काळात अनेक नवीन योजना, उपक्रम आम्ही सुरु केले. राज्यात महिलांच्या सक्षमीकरणासाठी जे काही करणे आवश्यक आहे ते सर्व करु, याबाबतीत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

राज्य महिला आयोगाच्या वतीने वनामती येथे महिलांसाठी 'सक्षमा' या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. यावेळी विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, आमदार मनिषा कायंदे, आमदार चित्रा वाघ, आमदार विक्रम काळे, आमदार मंजूळा गावित, आमदार सना मलिक, आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवळे, आयोगाच्या माजी सदस्य निता ठाकरे आदी उपस्थित होते.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी केंद्र सरकारने कठोर कायदे केले आहेत, या कायद्यांच्या जनजागृतीची गरज आहे. अत्याचाराची अनेक प्रकरणे अजूनही आपण पाहतो. एकीकडे महिलांना सक्षम करण्यासाठी प्रयत्न होत असतानाच काळीमा फासणाऱ्या घटना घडत आहे. त्यामुळे केवळ कायदे करुन चालणार नाही तर समाजात जनजागृती निर्माण करणे देखील तितकेच महत्वाचे आहे. महिला आयोगाच्या 'सक्षमा'सारखे जनजागृतीचे कार्यक्रम राज्यात ठिकठिकाणी झाले पाहिजे, असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

समाजाची प्रतिष्ठा महिलांच्या सुरक्षेवर अवलंबून असते. महिला सुरक्षित नसतील तर समाज सक्षम होणार नाही. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गेल्या दहा वर्षात महिला सुरक्षाविषयक बाबींमध्ये अनेक अमुलाग्र बदल केले. कालबाह्य कायदे रद्द करुन नवीन कायदे आणले आहेत. हे कायदे महिलांसाठी कवच कुंडले आहेत. या कायद्यातील तरतुदींची माहिती महिला आयोगामार्फत जनजागृतीच्या माध्यमातून महिलांपर्यंत पोहचवावी, असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

राज्य शासनाने गेल्या काळात महिलांसाठी भरीव काम केले. मुलींना उच्च शिक्षण विनामूल्य देण्याचा निर्णय घेतला. बस प्रवासात ५० टक्के सवलत, लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य, लखपती दीदी सारखे उपक्रम राबविले. महिलांच्या कल्याणासाठी राज्य शासन महिला आयोगाच्या मागे सक्षमपणे उभे आहे. आयोगाने अधिक सक्षमपणे काम करावे, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर म्हणाले की, आपल्या समाजात महिलांना सर्वोच्च स्थान आहे, असे असताना महिला असुरक्षित असल्याची कल्पना देखील दुःखदायक वाटते. केंद्र आणि राज्य शासनाने महिलांसाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. भारतीय न्याय संहितेद्वारे महिलांच्या सुरक्षेसाठी महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहे. हे कायदे व त्यातील तरतुदी महिलांपर्यंत पोहचल्या पाहिजे. महिला आयोगाच्या 'सक्षमा' कार्यक्रमातून या तरतुदी महिलांपर्यंत पोहचेल, असा विश्र्वास व्यक्त केला.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या, महिलांच्या सक्षमीकरणासाठी राज्य महिला आयोगाचे होत असलेले काम कौतुकास्पद आहे. महिलासांठी नवनवीन कायदे व चांगल्या तरतुदी शासनाने केल्या आहेत. त्याची जनजागृती होणे गरजेचे आहे. सक्षमा या कार्यक्रमाच्या माध्यमातून पिडीत महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न होतील. महिलांना आपले अधिकार व असलेल्या कायद्यांची माहिती असली पाहिजे.

महिला व बालविकास राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या, आपल्या समाजात महिलांना मानसन्मान, प्रतिष्ठा दिल्या जाते. परंतु वाईट प्रवृत्तीच्या काही लोकांमुळे महिला सुरक्षेबाबत बोलावे लागते. महिला सुरक्षा व सक्षमीकरणासाठी अनेक योजना केंद्र व राज्य शासनाने आणल्या. समाजाने देखील महिलांसाठी सकारात्मक वातावरण निर्माण केले पाहिजे. आमदार चित्रा वाघ यांनी देखील मनोगत व्यक्त केले.

प्रारंभी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी 'सक्षमा' या कार्यक्रमामागची भूमिका विषद केली. महिला सुरक्षेसाठी भारतीय न्याय संहितेत करण्यात आलेले बदल, महिला विषयक कायदे व सायबर सुरक्षेबाबत महिलांमध्ये जनजागृती घडविण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. न्याय संहितेतील तरतुदी महिला सुरक्षेसाठी अतिशय उपयुक्त असून महिलांनी त्याचा वापर केला पाहिजे. बालविवाह, हुंडाबळी यासारख्या विविध बाबींवर चळवळ स्वरुपात आयोगाच्यावतीने काम केले जात आहे. गेल्या वर्षभरात आयोगाने महिला संरक्षण व अत्याचाराविरोधात प्रखर भूमिका घेतली असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास विविध शासकीय कार्यालयांचे अधिकारी, महिला कर्मचारी, विविध समाजिक संघटनांच्या महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. दुसऱ्या सत्रात तज्ज्ञ मार्गदर्शकांद्वारे भारतीय न्याय संहितेतील बदल, महिला कायदे व सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

## व्यापार कृती समितीच्या विविध प्रश्नांबाबत पणन मंत्री जयकुमार रावल यांच्याकडून आढावा

नागपूर: महाराष्ट्र कृषी पणन



(विकास व विनियमन) नियम १९६३ दुरुस्त्यांबाबत पणन मंत्री जयकुमार रावल यांनी व्यापारी कृती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात आढावा घेतला. राज्यातील मोठ्या बाजार समित्यांना 'राष्ट्रीय बाजार समित्या' म्हणून श्रेणीउन्नत करुन शेतकऱ्यांच्या शेतीमालास आतंरराष्ट्रीय बाजारपेठ मिळवून दिली जाईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समिती यांच्या विविध प्रश्नांबाबत मंत्री रावल यांच्या अध्यक्षतेखाली आज बैठक झाली. यावेळी पणन महामंडळाचे संचालक संजय कदम, पणन सहसचिव विजयकुमार लहाने, सहसंचालक राजेंद्र तराळे यांच्यासह राज्यातील व्यापारी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

मंत्री रावल म्हणाले की, तालुकास्तरावरील कृषी उत्पन्न बाजार समित्या ह्या शेतकऱ्यांचा शेतीमाल विक्री करण्याचे हक्काचे ठिकाण आहे. शेतकरी-व्यापारी-मापारी-हमाल या साखळीच्या माध्यमातून विक्री प्रक्रिया चालते. ही साखळी अशीच अबाधित राहण्यासाठी व्यापाऱ्यांनी बाजार समितीसोबत समन्वयाने कार्य करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी उत्पादित शेतीमालास राज्य, देश व आंतरराष्ट्रीय स्तरावर बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी विभागाव्दारे मुंबई येथे मोठे हब निर्माण करण्याचे नियोजन आहे. त्याच्या माध्यमातून रेल्वे, भूमार्ग व समुद्री मार्गाने उत्पादित मालास सर्वस्तरावर बाजारपेठ उपलब्ध करुन दिली जाईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

व्यापारी संघटनांकडून प्राप्त सुचना व मागण्यांवर यावेळी बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. एपीएमसीत आलेल्या शेतीमालास बाजार समितीकडून युजर चार्जेस व सेस कर आकारु नये, ही प्रमुख मागणी व्यापारी संघटनांकडून मांडण्यात आली. त्यासंबंधी युजर चार्जेस व सेसमुळे अधिक प्रभावित होणाऱ्या घटकांसोबत पणन विभाग व व्यापारी संघटनेची बैठक घेण्यात येईल, यादृष्टीने एक अभ्यासपूर्ण अहवाल विभागास सादर करण्यात यावा, अशी सूचना यावेळी त्यांनी केली.

बाजार समित्यांकडून देण्यात येणाऱ्या अनुज्ञप्तीचे नूतनीकरणासाठी पारदर्शक प्रणालीचा अवलंब करण्यात यावा. जेणेकरुन व्यापारी वर्गाला सुटसुटीतपणे अनुज्ञप्तीचे वितरण होईल. एपीएमसी मध्ये कार्यरत कर्मचारी, मजूर आदींना शुध्द पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहासारख्या मूलभूत सुविधा उभारण्याबाबत यावेळी चर्चा झाली. राज्यातील व्यापारी संघटनांच्या पदाधिकारी व एपीएमसी प्रमुखांसोबत यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

# दलित चळवळतील जेष्ठ कार्यकर्त्यांचा सन्मान सोहळा व स्नेह भोजनाचे आयोजन

केज/प्रतिनिधी–दलित चळवळतील जेष्ठ कार्यकर्त्यांचा सन्मान सोहळा व स्नेह भोजनाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे आयोजन हे बुधवार दिनांक १० डिसेंबर रोजी करण्यात आले होते परंतु काही पँथरज्येष्ठ कार्यकर्ते हे महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबई व नागपूर येथे गेलेले आहेत. ते या कार्यक्रमास उपस्थित राहू शकत नाहीत म्हणून हा कार्यक्रम रविवार दिनांक १४ डिसेंबर २०२५ रोजी केज शहरातील महात्मा फुले नगर भागातील जे.के.फंक्शन हॉल येथे संपन्न होणार आहे. तरी केज शहरासह तालुक्यातील दलित चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन लखन हजारे शरद धीवार, अशोक गायकवाड यांनी केले आहे.



याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील व शहरातील अनेक पँथर,दलित चळवळतील ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी चळवळीसाठी मोठे योगदान दिलेले आहे. सध्या दलित चळवळीमध्ये युवक-तरुण कार्यकर्त्यांची फळी मोठ्या प्रमाणात आहे. परंतु पूर्वी पँथर म्हणून ओळखले जाणारे जेष्ठ कार्यकर्ते यांच्या कार्याला उजळा मिळावा व त्यांच्या कार्याची तरुण कार्यकर्त्यांना ऊर्जा मिळावी व त्यांची प्रेरणा घेऊन चळवळ पुढे नेण्याचे काम करावे, दलित चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी मोठा संघर्ष उभारून स्वतःचे आयुष्य हे समाजासाठी झिजवून चळवळ पुढे नेण्याचे काम केलेले आहे म्हणून जेष्ठ कार्यकर्त्याचा सन्मान होणे गरजेचे आहे.या संकल्पनेतून लखन हजारे, अशोक गायकवाड, शरद धीवार यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

रविवार दिनांक १४ डिसेंबर २०२५ रोजी १२-०० वाजता शहरातील महात्मा फुले नगर भागातील जे.के.फंक्शन हॉल येथे केज शहरासह तालुक्यातील ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सन्मान सोहळा व स्नेह मोजण्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी केज शहरासह तालुक्यातील दलित चळवळतील जेष्ठ कार्यकर्त्यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक लखन हजारे, अशोक गायकवाड,शरद धीवार यांनी केले आहे.

माध्यमांशी बोलताना आयोजकांनी सांगितले की, दलित चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सन्मान सोहळा व स्नेहभोजनाचे आयोजन हे बुधवार रोजी केले होते परंतु काही ज्येष्ठ कार्यकर्ते हे महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबई व नागपूर येथे गेलेले होते ते सध्या त्यांच्या नातेवाईकाकडे आहेत असे काही जेष्ठ कार्यकर्त्यांनी आयोजकांना भ्रमणध्वनीवरून माहिती दिली व त्यांनी सांगितले की,आम्ही बुधवार रोजी होणाऱ्या कार्यक्रमास उपस्थित राहू शकत नाहीत म्हणून हा कार्यक्रम बुधवार ऐवजी रविवारी करण्याचे नियोजित केले आहे. पुढे बोलताना आयोजक म्हणाले की, हा कार्यक्रम भीम नगर, महात्मा फुले नगर, क्रांतीनगर या शहरातील विविध ठिकाणी राहणाऱ्या सर्व युवकांच्या व चळवळीतील युवा कार्यकर्त्यांच्या सहकार्यातून संपन्न होणार आहे अशी माहिती दिली.

# भाजपाकडून निवडणूक लढविण्यास इच्छुकांची भाऊगर्दी,दोन दिवसात ६५० पेक्षा अधिक अर्ज दाखल.

लातूर (प्रतिनिधी) :- आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका भाजपाकडून लढविण्यास इच्छुक असणाऱ्यांकडून लातूर शहर जिल्हा भाजपाच्या वतीने अर्ज स्वीकृतीस प्रारंभ झाला आहे. या प्रक्रियेसाठी इच्छुकांनी मोठी भाऊगर्दी केलेली पाहण्यास मिळत आहे. दोनच दिवसात ७० जागांसाठी ६५० पेक्षा अधिक इच्छुकांनी आपले उमेदवारी अर्ज पक्षाकडे दाखल केले आहे. इच्छुकांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा उद्या दिनांक १० डिसेंबर २०२५ हा अंतिम दिवस असून इच्छुकांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल करावेत असे आवहान शहर जिल्हा भाजपाच्यावतीने करण्यात आले आहे.



लातूर शहर जिल्हा भाजपाच्यावतीने आगामी स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच मनपा निवडणूक लढविण्यास इच्छुक असणाऱ्यांसाठी उमेदवारी अर्ज स्वीकारण्यास प्रारंभ केला आहे. प्रदेश भाजपाकडून आलेल्या सूचनेनुसार हि प्रक्रिया पार पडत आहे. उमेदवारी अर्ज स्वीकारण्याचा शुभारंभ शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर व निवडणूक प्रमुख डॉ. अर्चना पाटील चाकूरकर, मनपाचे माजी गटनेते ॲड. शैलेश गोजमगुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला होता. भाजपाच्यावतीने निवडणूक लढविण्यास इच्छुक असणाऱ्यांची मोठी संख्या असल्यामुळे शहर भाजपा कार्यालयात मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. शहरातील अठराही प्रभागातून इच्छुकांची संख्या मोठी असल्याने शहर जिल्हा कार्यालय गर्दीने फुलून गेलेले पाहण्यास मिळत आहे. दोनच दिवसात उमेदवारी मागणाऱ्या इच्छुकांची संख्या ६५० पेक्षा अधिकची झाली आहे.

प्रदेश भाजपकडून आलेल्या सूचनेनुसार हि प्रक्रिया सुरु असून या सर्व इच्छुकांची यादी प्रदेश कार्यालयाकडे पाठविण्यात येत आहे. उमेदवारी निश्र्चितीसाठी उर्वरित प्रक्रिया पार पाडणे आवश्यक असल्याने इच्छुकांना आपला अर्ज दाखल करण्यासाठी उद्या गुरवार दिनांक १० डिसेंबर २०२५ शेवटचा दिवस असणार आहे. लातूर शहर जिल्हा भाजपा कार्यालय सकाळी ११ ते दुपारी २ यावेळेत इच्छुकांचे अर्ज स्वीकारले जात असून इच्छुकांनी आपले अर्ज वेळेत दाखल करावेत असे आवाहन शहर जिल्हा भाजपाच्या वतीने करण्यात आले आहे.

# वेळूवन विहारात महापरिनिर्वाण दिनानिमित्त बाबासाहेबांना अभिवादन

केज/प्रतिनिधी-केज शहरातील भीम नगर येथील वेळूवन बुद्ध विहारामध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. भारतीय बौद्ध महासभेच्या शहर शाखेच्या वतीने विहारामध्ये अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी सर्वप्रथम तथागत गौतम बुद्ध व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची दिपाने व धुपाने पूजन करण्यात आले त्यानंतर उपस्थितांनी त्रिशरण पंचशील ग्रहण केले. दोन मिनिट उभे राहून महामानवाला मानवंदना दिली.



भारतीय बौद्ध महासभेचे शहराध्यक्ष जयपाल मस्के यांनी बाबासाहेबांनी स्थापन केलेल्या समता सैनिक दल याबद्दल माहिती सांगितली.घर तिथे समता सैनिक हा निर्धार त्यांनी बोलून दाखवला.उपस्थित भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी नंदकुमार मस्के व शिवकुमार मस्के यांनीही आपले विचार मांडले.यावेळी विहारात भारतीय बौद्ध महासभेचे शहर पदाधिकारी कल्याण मस्के, शिवमूर्ती हजारे, दीपक मस्के तसेच महिला शाखेच्या सरचिटणीस आयु.सुरेखा मस्के, विजयमाला हजारे, कलावती हजारे, रत्नमाला मस्के, आशाताई मस्के, पुष्पा मस्के, कुसुम मस्के, सुनीता हजारे, मैनाबाई मस्के, हजारे ताई,कांबळे बाई तसेच बालक बालिका यांची मोठी उपस्थिती होती. शेवटी सरनत्त घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनी मुंबईत निळा जनसागर

मुंबई प्रतिनिधी / के. एच. हनवते :- ६ डिसेंबर महामानव, भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आज चैत्यभूमी, दादर येथे अभूतपूर्व जनसागर पाहायला मिळाला. महाराष्ट्रासह देशाच्या कानाकोपऱ्यातून लाखो अनुयायी मुंबईत दाखल झाले आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भावपूर्ण आदरांजली वाहिली.



चैत्यभूमी परिसर, शिवाजी पार्क, हिंदू कॉलनी परिसर सगळीकडे भीमसैनिकांची प्रचंड गर्दी उसळली. इतकी गर्दी झाली की दादरमध्ये उभे राहण्यासाठीही जागा उरली नाही. बाबासाहेबांच्या प्रतिमा, पुतळे, साहित्य, पुस्तके यांची मोठ्या प्रमाणात विक्री झाली. हजारो भाविकांसाठी भोजनदानाचे आयोजनही व्यापक पातळीवर झाले. राष्ट्रीय स्तरावरील प्रमुख व्यक्तींची उपस्थितीमहापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी येथे महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल आचार्य देवव्रत,वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश (बाळासाहेब) आंबेडकर,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थित राहून डॉ. बाबासाहेबांना विनम्र अभिवादन केले. वंचित बहुजन आघाडीचे नेतृत्व पुढाकारात आघाडीवरव्यवस्थापन, सुविधा आणि शिस्त यासाठी वंचित बहुजन आघाडीचे सर्व पदाधिकारी दिवसभर सक्रिय होते. विशेषतः मुंबई अध्यक्ष चेतन अहिरे, मुंबई महीला अध्यक्षा : स्नेहलताई सोहनी, मुंबई युवा अध्यक्ष सागर भाऊ गवई, कुर्ला तालुका अध्यक्ष स्वप्निल भाऊ जवळगेकर यांनी महानगरपालिकेसोबत समन्वय ठेवून त्यांच्या कर्मचाऱ्यांकडून काम व्यवस्थित व्हावे यावर काटेकोर नियंत्रण ठेवले. जिथे आवश्यकता भासली तिथे स्वयंसेवकांच्या मदतीने त्वरित सुविधा उपलब्ध करण्यात आल्या. वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश निरीक्षक (कामगार युनियन) प्रदीप गौतम साळवे यांनी सांगितले की, भीमसैनिकांना कोणतीही अडचण होऊ नये हा आमचा उद्देश होता. लाखोंच्या उपस्थितीतही व्यवस्थापन सुरळीत पार पडलं याचा आनंद आहे.चैत्यभूमीतील मुख्य कार्यक्रम वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांनी पंचशील ध्वज फडकावून कार्यक्रमाची सांगता केली.

यानंतर सामूहिक बुद्धवंदना, राष्ट्रगीत आणि महामानवांच्या स्मृतीला साजेसा अभिवादन सोहळा पार पडला.भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष भीमराव आंबेडकर, तसेच प्रा. अंजलीताई आंबेडकर, समता सैनिक दलाचे सैनिक आणि अनेक सामाजिक संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आग्निशमन दलाचे मार्गदर्शनचैत्यभूमी येथे अग्निशमन दलाचा स्टॉल उभारण्यात आला होता.

अग्निशमन अधिकारी बिपिन शिशुपाल यांनी समाजातील युवकांना फायर ब्रिगेडमध्ये कसे यावे, भरती प्रक्रिया कशी असते, कोणती तयारी आवश्यक आहे याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक आणि मार्गदर्शन दिले. तीन दिवसांचा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला. पंकज सरोदे महाराष्ट्र पोलीस न्यूज २४ पुणे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख - आंबेगाव तालुक्याची आदरांजली आंबेगाव तालुका बौद्ध सेवा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शशिकांत भालेराव यांनी तालुक्याच्या वतीने डॉ. बाबासाहेबांना विनम्र अभिवादन केले आणि सामाजिक कार्याची दिशा बाबासाहेबांच्या विचारांनुसारच राहील अशी भूमिका मांडली.

महापरिनिर्वाण दिनाचे सार एकच जोपर्यंत सूर्य आणि पृथ्वी आहे, तोपर्यंत बाबासाहेबांचे विचार अमर राहतील आणि जनतेची आदरांजली अविरत वाहत राहील.

# २३ गंभीर घरफोड्या उघड - चोरी गेलेले सोन्याचे दागिने, रोख रक्कम व दोन मोटारसायकलीसह कुख्यात टोळीतील ४ आरोपी जेरबंद

लातूर :-०३ वर्षांपासून सक्रिय अशी असून आरोपींची अंगझडती दागिने ३२,०००/- रोख




असलेले घरफोड्या करणारे टोळीचे पर्दाफाश - ७ आरोपींपैकी ४ अटक. एकूण मुद्देमाल ४,३७,०००/- जप्त.

लातूर जिल्ह्यात गेल्या काही महिन्यांपासून घरफोड्या व चोरीच्या गुन्ह्यांची मालिका सुरू होती. या गंभीर गुन्ह्यांच्या अनुषंगाने स्थानीय गुन्हे शाखा, लातूर यांनी अत्यंत कौशल्यपूर्ण आणि वैज्ञानिक तपास पद्धती वापरून घरफोड्या करणाऱ्या आंतरजिल्हा कुख्यात व सराईत टोळीचा पर्दाफाश केला आहे.

पोलीस अधीक्षक श्री अमोल तांबे यांच्या निर्देशावरून ,अपर पोलीस अधीक्षक, मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेने ही महत्वाची कारवाई यशस्वीरीत्या पूर्ण केली.

दिनांक ०६/१२/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेला गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, लातूर-बार्शी रोडवरील लातूर विमानतळ टी-पॉइंट येथे चार संशयित इसम दोन मोटारसायकलीसह थांबलेले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले व सापळा लावून खालील संशयितांना १४.०० वाजता ताब्यात घेण्यात आले.

ताब्यात घेतलेले आरोपी

१)अजय श्रावण शिंदे, वय २२, रा. सुंभा, जि. धाराशिव

२)अर्जुन दिलीप भोसले, वय २७, रा. भिवंडी/झरेगाव, जि. सोलापूर

३)केशव माणिक पवार, वय ३०, रा. खंडाळा, ता. तुळजापूर

४)विक्की सजगु-या शिंदे, वय १९, रा. सुंभा, जि. धाराशिव

घेतली असता त्यांच्याकडे सोन्याच्या ३ अंगठ्या,१ गंठण, कानातील फुले, व रोख रक्कम ३२,००० मिळून आले.

तसेच त्यांनी गुन्ह्यात वापर केलेल्या चोरीच्या १ लाख ३० हजार रुपये किमतीच्या दोन मोटरसायकली हिरो होंडा स्प्लेंडर क्रमांक चक२५ इक्र १३६८, टीव्हीएस अपाची २५ इक्र १३८२ हे पण जप्त करण्यात आले आहेत.

आरोपींची कबुली - २३ घरफोड्यांचा खुलासा.

चौकशीदरम्यान आरोपींनी कबुली दिली की, त्यांनी त्यांच्या आणखीन इतर तीन साथीदारासह मिळून गेल्या एक वर्षात लातूर, धाराशिव, बिदर जिल्ह्यातील एकूण २३ घरफोड्या केल्या असून त्यांनी सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरी करणे इत्यादी गंभीर गुन्ह्यात ही टोळी सामील आहे.

लातूर जिल्ह्यातील १८ व बाहेरील जिल्ह्यातील ५ असे एकूण २३ गुन्हे उघडकीस आले

औसा, किल्लारी, मुरुड, रेणापूर, कासारशिरसी, लातूर ग्रामीण, गातेगाव, भादा आदी ठिकाणच्या १८ घरफोड्या. तसेच उमरगा, धाराशिव ग्रामीण, मंटाळा, मुडबी (बिदर) इत्यादी ठिकाणचे गंभीर चोरीचे एकूण ५ गुन्हे उघडकीस आले आहेत.

सदरची टोळी ही कुख्यात व सराईत असून एकट्या धाराशिव जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्याला नमूद टोळी विरुद्ध चोरी, घरफोडी, दरोड्या सारखे तब्बल ५७ गुन्हे दाखल असल्याचे चौकशीत समोर आले आहे.

नमूद आरोपीकडून २,७५,०००/- सोन्याचे दागिने ३२,०००/- रोख रक्कम,१,३०,०००/- च्या २ मोटारसायकली, असा एकूण ४,३७,०००/- मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक, सुधाकर बावकर यांचे नेतृत्वात पथकामधील सपोनि सदानंद भुजबळ, अमितकुमार पुणेकर, पोउपनि राजाभाऊ घाडगे, पोउपनि प्रमोद देशमुख ,पोउपनि अमर केंद्रे, पोलीस ठाणे भादा चे सहाय्यक पोलीस निरीक्षक महावीर जाधव, मुरुडचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक उजगरे, सपोउपनि सर्जेराव जगताप, पोलीस अंमलदार माधव बिलापटटे, युवराज गिरी, नवनाथ हासबे, रामलिंग शिंदे, तुराब पठाण, राजेश कंचे, मोहन सुरवसे,संजय कांबळे, सूर्यकांत कलमे, अर्जुन राजपूत, दिनानाथ दवकते, रियाज सौदागर, प्रशांत स्वामी, सिद्धेश्र्वर मदने, जमीर शेख, तुळशीराम बरुरे, पाराजी पुटेवाड, मनोज खोसे, राहुल कांबळे, हल्लाळे, प्रविण कोळसुरे, चंद्रकांत केंद्रे, संतोष खांडेकर, व्यंकटेश निटुरे, प्रदीप चोपणे, जांभळे, सुहास जाधव, धनंजय गुट्टे, प्रज्वल कलमे, गोरोबा इंगोले, शैलेश सुडे, सागर आलापुरे, बाबा खोपे, महिला पोलिस अंमलदार अंजली गायकवाड यांनी केली आहे.

पोलीसांचे आवाहन-लातूर जिल्हा पोलीस नागरिकांच्या सुरक्षेकरिता पूर्ण कटिबद्ध आहेत. नागरिकांनी घरफोडी किंवा संशयास्पद हालचाली आढळल्यास तात्काळ जवळच्या पोलीस स्टेशनशी अथवा ११२ वर संपर्क साधावा.

## राज्यस्तरीय तायक्कांदो स्पर्धेत पुणे जिल्ह्याला विजेतेपद तर ठाणेला उपविजेतेपद.



लातूर प्रतिनिधी : जिल्हा क्रीडा संकुल औसा रोड लातूर येथे ३५ वी राज्यस्तरीय वरिष्ठ गट महिला व पुरुष अजिंक्यपद तायक्कांदो स्पर्धेत क्यूरोगी या प्रकारात पुणे जिल्ह्याने ९६ गुण प्राप्त करत सर्वसाधारण विजेतेपद जिंकले तर २९ गुणांवर ठाणे जिल्ह्याने उपविजेतेपद प्राप्त केले असून या स्पर्धेत उत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार निकिता पवार जळगाव व कानिफनाथ पोकळे पुणे या खेळाडूने पटकावला आहे तर पुमसे या प्रकारात रायगड जिल्ह्याने विजेते पद तर पालघर जिल्ह्याला उपविजेतेपद प्राप्त झाले असुन उत्कृष्ट पुमसे खेळाडू म्हणून मृणाली हरणेकर व वंश ठाकुर यांना पुरस्कार देण्यात आला आहे.

शासन मान्यता प्राप्त ऑलिम्पिक खेळाच्या ३५ व्या राज्यस्तरीय वरिष्ठ गट महिला व पुरुष अजिंक्यपद तायक्कांदो स्पर्धेचे तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र मुंबई यांच्या मान्यतेने तायक्कांदो असोसिएशन ऑफ लातूर या जिल्हा संघटनेने दिनांक ०५ ते ०७ डिसेंबर दरम्यान जिल्हा क्रीडा संकुल औसा रोड लातूर येथे आयोजन केले होते. या स्पर्धेत महाराष्ट्रातील प्रतिभावान आंतरराष्ट्रीय खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता स्पर्धेचे उद्घाटन लातूर काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष ड किरण जाधव यांनी केले होते तर पदके व पारितोषिके वितरण तायक्कांदो राज्य संघटनेचे अध्यक्ष डॉक्टर अविनाश बारगजे यांच्या हस्ते वितरित करण्यात आले या स्पर्धेत राज्यातील २८ जिल्ह्यातून ३२० खेळाडू सहभागी झाले होते.

अजिंक्यपद स्पर्धा...अजिंक्यपद स्पर्धे साठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील शासनाने निर्गमित केलेल्या वयोगट व वजनी गटातील खेळाडूंची जिल्हास्तरावर निवड झालेल्या खेळाडूंना राज्यस्तरीय स्पर्धे त सहभाग देण्यात आला तर तायक्कांदो खेळातील क्यूरोगी प्रकारात पुरुष व महिला असे एकूण १६ खेळाडू व क्युरोगी प्रकारात ३५ प्रथम क्रमांकाचे खेळाडू निवड करुन हैदराबाद येथे संपन्न होत असलेल्या राष्ट्रीय स्पर्धेत सहभागासाठी पाठवले जात आहे - स्पर्धा आयोजक श्री नेताजी जाधव

यावेळी तायक्कांदो फेडरेशन ऑफ इंडिया चे सहसचिव तथा स्पर्धा निरीक्षक मिलिंद पठारे, राज्य संघटनेचे अध्यक्ष डॉक्टर अविनाश बारगजे, उपाध्यक्ष दुलीचंद मेश्राम, आंतरराष्ट्रीय पंच प्रवीण बोरसे व सुभाष पाटील, के वाय पटवेकर लिंबराज पन्हाळकर यांची उपस्थिती होती तर स्पर्धा यशस्वीतेसाठी एस व्ही कुलकर्णी, धनश्री मदने, जान्हवी मदने, गीतांजली नागरगोजे रागिनी क्षीरसागर, अनुश्री कुलकर्णी, विश्वजीत जाधव, आकाश मिरगे यांच्यासह जिल्ह्यातील तायक्कांदो खेळाडूंनी परिश्रम घेतले.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य देशासाठी महत्वाचे तर क्रांतिसिंह नाना पाटील प्रति सरकारचे प्रणेते-डॉ.वसुदेव गायकवाड

केज/प्रतिनिधी-स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता. केज जि.बीड येथे दिनांक ६ डिसेंबर २०२५ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन व क्रांतीसिंह नाना पाटील यांची पुण्यतिथी व्याख्यान व परिसंवाद कार्यक्रम घेवून साजरा करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत,जेष्ठ समाज सेवक,महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्याते,प्राचार्य,डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर व क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करूनमान्यवरांच्या हस्ते पुजन व वंदन करण्यात आले.प्रमुख व्याख्याते म्हणून एस.के. वैरागे यांचे छोटेखानी व्याख्यान झाले.त्यानंतर परिसंवाद कार्यक्रम घेण्यात आला.या परिसंवादात



वामन गायकवाड,बाळासाहेब गायकवाड,रामराजे गायकवाड,अरुण गायकवाड,रमेशराव गायकवाड,ग्रंथालयाचे आनंद गायकवाड यांनी सहभाग घेतला.

परिसंवादात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य कर्तृत्व व क्रांतिसिंह नाना पाटलांचे कार्य कर्तृत्व यावर परिसंवाद झाला. त्यानंतर अध्यक्षीय समारोप डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केला. देशाच्या जडणघडणीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मोठे योगदान होते तसेच देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत क्रांतिसिंह नाना पाटील यांचे मोठे योगदान होते असे प्रतिपादन डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे देशासाठी मोठे योगदान होते तर क्रांतिसिंह नाना पाटील पत्री सरकार व प्रति सरकारचे प्रणेते होते असे अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्रतिपादन डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक,सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.

कार्यक्रमाला रावसाहेब जाधव,प्रकाश गायकवाड, पांडूरंग गायकवाड,ए.बी. गायकवाड,यांच्या सह युवक,विद्यार्थी,जेष्ठ नागरिक,वाचक, हितचिंतक यांचीउपस्थिती होती.

## केज शहरातील नालंदा विद्यालयात महामानव विनम्र अभिवादन

केज/प्रतिनिधी -केज शहरातील महात्मा ज्योतिबा फुले शिक्षण प्रसारक मंडळ केज संचलित,केज शहरातील नालंदा विद्यालय येथे महामानव परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र अभिवादनाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक श्री.नंदकुमार मस्के सर तर प्रमुख प्रमुख वक्ते म्हणून श्री. नवनथ कांबळे सर उपस्थित होते. सर्वप्रथम परमपूज्य बोधिसत्व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे दीप, धूपाने,व पुष्पाने पूजन करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक सचिन वाघमारे सर यांनी केले प्रस्ताविकानंतर शाळेतील विद्यार्थी प्रतिनिधी आर्यन बचके यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर अभिवादन पर आपले मनोगत व्यक्त केले.



या कार्यक्रमाप्रसंगी शाळेतील ज्येष्ठ शिक्षक कांबळे.एन.व्ही. सर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील काही महत्वाचे प्रसंग विद्यार्थ्यासमोर मांडले. व भारतीय संविधानाचे महत्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

अध्यक्षीय समारोपात शाळेचे मुख्याध्यापक श्री नंदकुमार मस्के सर यांनी महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट उघडून सांगितला बाबासाहेब वर्गाच्या बाहेर बसून शिकले . कारण तत्कालीन समाजामध्ये जातीयता शिगेला पोहोचली होती.अशा परिस्थितीमध्ये बाबासाहेबांनी शिक्षणाची कास धरून आपले शिक्षण पूर्ण केले आहे.

तत्कालीन समाजामध्ये आपले विचार बहुजनापर्यंत पोहोचावेत व समाजामध्ये जनजागृती व्हावी याकरिता बाबासाहेबांनी मूकनायक,

जनता, बहिष्कृत भारत, प्रबुद्ध भारत,यासरखी वर्तमानपत्र सुरू केली. कारण लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ वर्तमानपत्रे होय. तसेच बाबासाहेब आंबेडकरांनी नदी जोड प्रकल्पाची कल्पना मांडली होती. बाबासाहेबांनी भारतामधील पडणाऱ्या पावसाचा महापुरांचा विचार करून आपले जलधोरण तयार केले. त्यांनी तयार केलेल्या जलधरणामुळेच या भारतामध्ये मोठ-मोठी धरण अस्तित्वात आहेत. बाबासाहेबांनी आपल्या देशामध्ये वीज निर्मिती करण्यासाठी पाठपुरावा करून वीज निर्मिती आपल्या देशामध्येच होईल यासाठी प्रयत्न केले. तसेच महाराष्ट्रातील गोरगरीब व बहुजनांच्या विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे याकरिता पीपल्स एज्युकेशन सोसायटी बॉम्बे या शिक्षण संस्थेची स्थापना करून मुंबईमध्ये सिद्धार्थ कॉलेज व औरंगाबाद या ठिकाणी मिलिंद महाविद्यालयाची स्थापना करून बहुजनांना शिक्षणाची दालने खुली केली. बाबासाहेबांनी महिलांच्या विविध समस्यांचा सखोल साडेचार वर्ष अभ्यास करुण भारतामधील महिलांसाठी हिंदू कोड बिल तयार केले व ते संसदेत मांडले परंतु संसदेमध्ये त्या हिंदू कोड बिलाला कडाडून सर्वांनी विरोध केला. बाबासाहेबांनी केंद्रीय कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला. रक्ताचा एक थेंब न सांडता फार मोठी धार्मिक क्रांती घडवून आणली.

शाळेतील विद्यार्थ्यांनी महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज ,छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर,अशा महापुरुषांचा आदर्श घेऊन देशासाठी व समाजासाठी चांगले काम करावे. आदर्श नागरिक होण्यासाठी महापुरुषांचे विचार अत्यंत मोलाचे काम करतात.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री. वाघमारे.एस.बी.,श्री.कदम.एस.एस.,श्री.बडे. ऐ.टी.,श्रीमती गुरमे.टी.एम.,या कार्यक्रमाप्रसंगी सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी वाघमारे सर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे आभार मानले.

## विष्णुदास अग्रवाल यांचे निधन




लातूर : येथील प्रिंटिंग व्यवसायातील ज्येष्ठ उद्योजक विष्णुदास रामकिशन अग्रवाल यांचे रविवारी दुपारी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८९ वर्षे होते. स्व. विष्णुदासजी अग्रवाल यांच्या पार्थिवावर सोमवारी सकाळी मारवाडी स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

लातूरच्या प्रिंटिंग व्यवसायातील एक अग्रगण्य व्यक्तिमत्व अशी ओळख असलेले स्व. विष्णुदास अग्रवाल यांचे लातूरच्या मुद्रण क्षेत्रात अत्यंत उल्लेखनीय असे योगदान राहिले आहे. स्व. विष्णुदास अग्रवाल यांनी बदलत्या काळाप्रमाणे व्यवसायात आमूलाग्र बदल घडवून ट्रेडलपासून ते बहुरंगी ऑफसेट छपाईची संपूर्ण यंत्रणा लातुरात उपलब्ध करून देण्याचे महत्वपूर्ण कार्य केले आहे. यशस्वी उद्योजक तसेच एक मानवतावादी दृष्टीकोनाने सर्वांना सोबत घेऊन चालणारे सर्वव्यापी व्यक्तित्वाचे धनी म्हणूनही त्यांची आपल्या निकटवर्तीयात ओळख होती. गरजवंतांच्या हाकेला ओ देण्याबरोबरच सर्वतोपरी सहकार्य करण्याकामीही ते कायम तत्पर असत. त्यांच्या जाण्याने लातूरच्या मुद्रण व्यवसायाची अपरिमित अशी हानी झाली आहे. त्यांनी उस्मानाबाद जिल्हा मुद्रण संघटनेच्या अध्यक्षपदाची जबाबदारीही पार पाडली होती. तसेच सन २००० मध्ये लातूर येथे घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य मुद्रण परिषदेच्या ४६ व्या राज्यस्तरीय अधिवेशनाचे स्वागताध्यक्षपदाची जबाबदारीही त्यांनी सक्षमपणे पार पाडली होती.

स्व. विष्णुदासजी अग्रवाल यांच्या पार्थिवावर सोमवारी, दि. ८ डिसेंबर २०२५ सकाळी लातूरच्या मारवाडी स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, उद्योग अशा विविध क्षेत्रातील मंडळींची उपस्थिती होती. स्व . विष्णुदासजी अग्रवाल यांच्या पश्चात नरेंद्र व कमलकिशोर अग्रवाल ही दोन उद्योजक मुले, एक मुलगी, सुना - नातवंडे असा मोठा परिवार आहे.

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात संत शिरोमणी संताजी जगनाडे यांची जयंती उत्साहात साजरी

लातूर-महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, जयंती महोत्सव समिती आणि कार्यालय द्वारा संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे, इतिहास विभाग प्रमुख डॉ. सदाशिव दंदे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. यशवंत वळवी, डॉ. जे. एच. देशमुख, हिन्दी विभाग प्रमुख डॉ. मनोहर चपळे, प्रा. व्ही. जे. दुडिले, कार्यालय प्रमुख नामदेव



बेंद्रगे आणि सोपान सुतार यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी संत जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेला प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी हिन्दी विभाग प्रमुख डॉ. मनोहर चपळे आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंद्रगे यांनी संत जगनाडे महाराज यांची माहिती दिली. अध्यक्षीय समारोप प्रो. डॉ. आनंद शेवाळे यांनी केला तर आभार डॉ. जे. एच. देशमुख यांनी मानले.

## दयानंद विज्ञानमध्ये संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी



लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.०८ डिसेंबर २०२५ रोजी संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी संत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले आणि सर्वांना जयंतीच्याही शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी पर्यवेक्षिका डॉ. संध्या कोल्हे,बन्सी कांबळे,प्रा. विजयकुमार मांदळे,सुदाम सातपुते,किशोर जाधव,धीरज पारिख, बाबासाहेब बचाटे,श्रावण माळी, हाकानी शेख यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## प्रभाग क्र. १० मधून पूजा कांबळे यांनी भाजपाकडे उमेदवारी मागणी अर्ज

लातूर :- भारतीय जनता पार्टी कार्यालय, महात्मा



गांधी चौक, लातूर येथे आज सौ. पूजा ताई सचिन कांबळे यांनी प्रभाग क्र. १० (अनु.जाती महिला प्रवर्ग) यासाठी उमेदवारी मागणी अर्ज भारतीय जनता पार्टी, लातूरच्या अर्ज स्वीकृत समिती यांचेकडे सादर केला.

यावेळी अर्ज दाखल कार्यक्रमास मार्गदर्शन व आशीर्वादासाठी माजी नगरसेविका रागिणीताई यादव, सरचिटणीस निखिल गायकवाड, महिला जिल्हाध्यक्षा सौ. शीतल मालू, पू. अहिल्यादेवी होळकर मंडळ अध्यक्ष काका चौगुले, माजी नगरसेविका सौ. शोभा पाटील, पू. अहिल्यादेवी होळकर मंडळ माजी अध्यक्ष सतीशभाऊ ठाकूर, आनंद माने, संतोष ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.